आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२६ ऑगस्ट २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस; नंदुरबार, नाशिक, बीडसह अनेक भागातली पीकं संकटात / गुजरातच्या अनेक भागात पूरसदृश स्थिती

- दुसऱ्या भारत-सिंगापूर गोलमेज परिषदेत परस्पर सहकार्य वाढवण्याबाबत दोन्ही देशांच्या नेत्यांमध्ये चर्चा

- देशभरात गोकुळाष्टमीचा उत्साह; राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांकडून देशवासियांना शुभेच्छा

- छत्तीसगढमधे एकूण २९ लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या २५ माओवाद्यांचं आत्मसमर्पण

**आणि**

- शेअर बाजारात तेजी / राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी पुन्हा २५ हजाराच्या वर / सेन्सेक्समधे ६१२ अंकांची वाढ

**<><><><><>**

महाराष्ट्रात आजही विविध जिल्ह्यात जोरदार पावसाची नोंद झाली आहे. **नंदूरबार** जिल्ह्यातल्या शहादा शहरात मुसळधार पाऊस झाला असून सुसरी धरणातून गोमाई नदीत विसर्ग सुरु आहे. गेल्या तीन दिवसांपासून जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक तालुक्यातल्या शेतांमध्ये पाणी शिरलं असून तीन जण वाहून गेले आहेत. ४२ घरांची पडझड झाली

आहे. पावसामुळे केळी, पपई आणि कापसाच्या पिकाला धोका निर्माण झाला आहे.

**नाशिक** जिल्ह्यातल्या सुरगाणा, पेठ, त्र्यंबक या तालुक्यांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली असून ग्रामीण भागात अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली आहे. अनेक तालुक्यांमध्ये पिकांचं नुकसान झालं आहे. संततधार पावसामुळे जिल्ह्यातल्या दहा धरणांमधून विसर्ग सुरू आहे.

**बीड** जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यांपासून पावसाचं प्रमाण प्रचंड वाढलेलं असल्यानं शेतीचं नुकसान झालं आहे. पावसानं रस्तेही पाण्याखाली गेल्याने जनजीवन विस्कळीत झालं आहे.

**धुळे** जिल्ह्यातल्या अक्कलपाडा धरणातून आज पुन्हा विसर्ग वाढवल्यामुळे पांझरा नदीची पाणीपातळी आणखी वाढली असून, नदीवरचे तीन पूल वाहतुकीसाठी बंद केले आहेत. नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. धुळे शहरातल्या मोती नाला, सुशी नाला यांची पाणी पातळी वाढून घरांमध्ये पाणी शिरलं आहे. या नाल्यांकाठच्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे.

**सातारा** जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाचा जोर असल्यानं सर्वच धरणांमधल्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे वाई इथल्या धोम आणि बलकवडी धरणातून कृष्णा नदीत विसर्ग सुरु आहे.

**<><><><><>**

मुसळधार पावसामुळे आज गुजरातच्या अनेक भागात पूरसदृश स्थिती निर्माण झाली. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी गांधीनगर इथल्या आप्तकालीन साहाय्य केंद्रात उच्चस्तरीय बैठक घेऊन राज्यातल्या पूरस्थितीचा आढावा

घेतला. पुराच्या पाण्यात अडकलेल्या लोकांची सुटका करण्याला प्राधान्य द्यावं अशा सूचना मुख्यमंत्री पटेल यांनी या बैठकीवेळी दिल्या. भारतीय हवामान विभागानं पुढच्या पाच दिवसांत गुजरातमध्ये जोरदार ते अतिजोरदार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे राज्यातल्या २८ जिल्ह्यांना रेड अलर्ट देण्यात आला आहे.

**<><><><>**

दुसरी भारत-सिंगापूर गोलमेज परिषद आज सिंगापूर इथं झाली. भविष्यात दोन्ही देशात सहकार्य वाढवण्याबाबत दोन्ही देशांच्या नेत्यांमध्ये चर्चा झाली. डिजिटायझेशन, कौशल्य विकास, शाश्वत विकास, आरोग्य आणि औषधी या क्षेत्रांबद्दल यावेळी चर्चा करण्यात आली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, आणि वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल या परिषदेला उपस्थित होते.

भारत आणि सिंगापूर यांच्या राजनैतिक संबंधाच्या ६० व्या वर्धापनदिनानिमित्त जागतिक स्तरावर सहकार्य करण्याबाबत दोन्ही देशांच्या नेत्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली. त्याआधी भारतीय मंत्र्यांनी सिंगापूरचे राष्ट्रपती थर्मन षण्मुगरत्नम आणि प्रधानमंत्री लॉरेन्स वॉन्ग यांची भेट घेतली.

**<><><><>**

श्रीकृष्णाचा जन्मसोहळा म्हणजेच गोकुळाष्टमी आज देशभरात मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावानं साजरी होत आहे. मथुरेसह देशभरातल्या सर्वच मंदिरांमध्ये विशेष कार्यक्रम आयोजित केले आहेत.

राज्यातल्या विविध मंदिरांमध्ये विशेष पूजा अर्चा आणि श्रीकृष्ण जन्माष्टमीचे कार्यक्रम आयोजित केले आहेत. श्रीकृष्णाची मुर्ती, पाळण्यात बसवून हा सोहळा साजरा करण्याची प्रथा असून उद्या मुंबईसह विविध ठिकाणी गोविंदा पथके गल्लोगल्ली उभारलेल्या दहीहंड्या फोडण्यासाठी बाहेर पडतील.

जन्माष्टमीनिमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

लडाख या केंद्रशासित प्रदेशात पाच नवे जिल्हे तयार करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज ही माहिती दिली. नव्या रचनेनुसार लडाखमध्ये जास्कर, द्रास, शाम, नुब्रा आणि चांगथांग हे पाच जिल्हे तयार केले जाणार आहेत. विकसित आणि समृद्ध लडाख बनवण्याच्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेची पूर्तता करण्यासाठी या जिल्ह्यांची निर्मिती केल्याचं शाह यांनी सांगितलं. नवीन जिल्ह्यांसाठी आवश्यक मुख्यालयाची निर्मिती, सीमांची आखणी, पदांची निर्मिती आदी मुद्द्यांवर कार्यवाही करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्रालयाने एका समितीची स्थापना केली आहे.

**<><><><><>**

छत्तीसगढच्या बिजापूर जिल्ह्यात २५ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. या माओवाद्यांपैकी तिघांवर प्रत्येकी आठ लाखाचं, एकावर ३ लाखांचं तर दोन माओवाद्यांवर प्रत्येकी १ लाखांचं पारितोषिक असं एकूण २९ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर झालं होतं. केंद्रीय राखीव पोलीस दलाचे जिल्हा

पोलिस अधिक्षक आणि पोलिस महासंचालक यांच्या समोर त्यांनी आत्मसमर्पण केलं. या माओवाद्यांना छत्तीसगढ राज्यसरकारने प्रत्येकी २५ हजार रुपयांचा पुनर्वसन निधी दिला आहे.

<><><><><>

भारतीय शेअर बाजारांमध्ये आज तेजी पाहायला मिळाली. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीनं २५ हजाराचा टप्पा पुन्हा ओलांडला. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ६१२ अंकांची वाढ झाली आणि तो ८१ हजार ६९८ अंकांवर बंद झाला. तर निफ्टी १८७ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ११ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसचे नितीन पाटील यांची राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली आहे. आज त्यांनी विधानभवनात निवडणूक अधिकाऱ्यांकडून निवडीबाबतचं पत्र स्वीकारलं. बिनविरोध निवड झाल्याबद्दल पक्षाचे कोषाध्यक्ष आणि सरचिटणीस आमदार शिवाजीराव गर्जे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचं अभिनंदन केलं. यावेळी पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी पॅनिक बटणं बसवण्याचा उपक्रम राबवला जाणार आहे. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आज मुंबईत बातमीदारांना ही माहिती दिली. शाळांमध्ये तक्रारपेट्या बसवण्याचं काम तातडीनं पूर्ण करणार असून पोलिसांच्या उपस्थितीत या पेट्या उघडण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं काल घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातल्या आरोपीची रवानगी १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.

**<><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार वसंतराव चव्हाण यांचं आज पहाटे निधन झालं. ते ७० वर्षांचे होते. सरपंच, विधानपरिषद, विधानसभेचे सदस्य ते लोकसभेचे खासदार असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे. याशिवाय शिक्षण, सहकार आणि कृषी क्षेत्रात त्यांनी महत्वाचं योगदान दिलं आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर हैद्राबादमधल्या रुग्णालयात उपचार सुरू होते. आज पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. उद्या सकाळी नांदेड जिल्ह्यात नायगाव इथं त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वसंतराव चव्हाण यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, भाजपा खासदार अशोक चव्हाण यांनीही वसंतराव चव्हाण यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><>**

वर्षातली शेवटची टेनिस ग्रँडस्लॅम यूएस खुली अजिंक्यपद स्पर्धा आजपासून न्यूयॉर्कमध्ये सुरू होणार आहे. भारताचा सुमित नागल आणि रोहन बोपण्णा हे दोघे स्पर्धेत उतरतील. एकाच वर्षात चारही ग्रँडस्लॅम स्पर्धांच्या एकेरीत खेळणारा सुमीत नागल २०१९ नंतरचा पहिला भारतीय पुरुष टेनिसपटू ठरला आहे.

पुरुष एकेरीत गतविजेता नोव्हाक जोकोविच, फ्रेंच आणि विम्बल्डन अजिंक्यपद विजेता कार्लोस अल्काराज, तसंच अग्रमानांकित यानिक सिनर यांच्यावर टेनिसपटूंचं लक्ष असेल. तर महिला एकेरीत गतविजेती कोको गॉफ, माजी विजेती इगा श्वियांतेक, एलेना रिबाकीना आणि अरीना साबालेंका या चौघी जेतेपदाच्या प्रबळ दावेदार असतील.

<><><><><>

जम्मू काश्मीरच्या आगामी विधानसभा निवडणूकीसाठी भाजपाने आज सोळा उमेदवारांची यादी जाहीर केली. ९० जागांसाठी होणाऱ्या या निवडणुकीकरता भाजपानं याआधी ४४ उमेदवारांची यादी जाहीर केली होती मात्र ती नंतर मागं घेतली. या निवडणुका येत्या १८ सप्टेंबरपासून तीन टप्प्यात होणार आहेत. मतमोजणी ४ ऑक्टोबरला होईल.

<><><><><>

दक्षिण आशियाई फुटबॉल महासंघानं आयोजित केलेल्या वीस वर्षांखालील फुटबॉल स्पर्धेत आज भारतीय संघाला बांगलादेशाकडून पराभव पत्करावा लागला. नेपाळमधे काठमांडू इथं या स्पर्धेचा अंतिम सामना झाला.

हा सामना १-१ असा बरोबरीत सुटल्यानं बांगलादेशानं पेनल्टी शूटआऊटच्या बळावर ४-३ अशी मात करून स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं.

//<><><><><>//